| | |
|---|---|
| **MHNS240004952013** | पांडूरंग शामराव वनीस<br>वि.<br>इंदुबाई दगा वनीस व इतर |

निशाणी ११५ वरील आदेश

वादी यांनी सदरचा अर्ज अबेटमेंट आदेश रद्द होणेसाठी दाखल केला आहे.

२. वादी यांचा अर्ज व त्यावर प्रतिवादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

३. वादी यांचे असे कथन आहे की, वादीने वाटपासाठी दावा दाखल केला आहे. दरम्यान प्रतिवादी क्र. ९, १०, १२ व १४ यांचे निधन झाले; मात्र त्यांची माहिती वादीस वेळेत मिळाली नाही. त्यामुळे त्यांच्या वारसांना रेकॉर्डवर आणण्यास अनुक्रमे २८१९, ३८२७, ३४१४ व ४३०९ दिवसांचा विलंब झाला आहे. परिणामी सदर दावा अबेट झाला आहे. तसेच झालेली ॲबेटमेंट सेट–असाईड होवून मिळणे आवश्यक आहे. त्याकरीता सदरचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

४. प्रतिवादी यांनी आपले म्हणणे सादर करुन अर्जास प्रखर हरकत घेतली. प्रतिवादी यांनी अर्ज कायदेशिर नाही तसेच मोठ्या विलंबाने दिला असून वादीस मयतांबाबत चांगले माहिती होते. परंतू कामकाज लांबणीवर टाकणेच्या हेतून दिलेला आहे. प्रतिवादींनी सदर अर्ज नामंजुर करण्यावी विनंती केली आहे.

५. सदरचा दावा वाटपासाठी दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. वाटपाचा दावा गुणदोषांवर निर्णयीत करण्याकरीता दावा मिळकतीशी हितसंबंध असलेल्या सर्व पक्षकारांना दाव्यात सामील करणे आवश्यक असते. सदर पक्षकारांच्या अनुपस्थितीमध्ये दावा निर्णयीत करता येत नाही. त्यामुळे सदर प्रकरणातील प्रस्तावित कायदेशीर प्रतिनीधी हे दाव्यातील आवश्यक पक्षकार असून त्यांची उपस्थिती दावा गुणदोषावर निर्णयीत करण्याकरीता आवश्यक आहे. दाव्याचे स्वरूप पाहता सदरच्या दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रतिवादी क्र.९ अर्जुन धना वनीस, प्रतिवादी क्र.१० केदा अण्णा वनीस, प्रतिवादी क्र. १२ श्रावण जिभाउ वनीस व प्रतिवादी क्र. १४ वामन धना वनीस यांचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे त्याकरीता प्रतिवादी क्र.९, १०, १२, व १४ यांच्याविरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्र. ९, १०, १२, व १४ चे वारस रेकॉर्डवर घेतल्यामुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. मुदतीत सदरचा अर्ज दाखल केलेला नाही त्यामुळे वादीवर अर्जाचा खर्च बसविणे उचित व योग्य वाटते खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

वादी यांचा निशाणी क्र.११५ वरील अर्ज रक्कम रुपये ५००/- ( रुपये पाचशे फक्त) प्रतिवादीस पुढील तारखेस देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

MADHUSUDAN DINKAR MAHADIK
Digitally signed by MADHUSUDAN DINKAR MAHADIK
Date: 2026.04.01 17:22:09 +0530

**ठिकाण : सटाणा**
**दिनांक : ०१/०४/२०२६**

**( मधुसूदन दिनकर महाडीक )**
**२ रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सटाणा,**
**जि. नाशिक**